# बारामतीत करुणा मुंडेंच्या उमेदवारीला भाजपची फुस?

## आमदार रोहित पवारांचा थेट आरोप

▶ पुणे , नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. बारामती विधानसभा पोटनिवणुकीत अपक्ष म्हणून मैदानात असणाऱ्या करुणा मुंडे यांना भाजपची अप्रत्यक्ष फुस असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे. बारामतीत करुणा मुंडे यांना रोखणे भाजपच्या हातात होते. पण त्यांनी तसे प्रयत्नच केले नाही, असे ते म्हणालेत. त्यांना भाजपच्या एखाद्या मोठ्या नेत्याने सांगितले असते, तर त्यांनी आपला अर्ज ठेवला नसता. त्यांनी तो मागे घेतला असता. याच्या मागचे कारण असे की, महाविकास आघाडीचे सरकार गेले, त्यावेळी आम्ही सर्व आमदारांनी सह्या करून अजित पवार यांची विरोधी पक्षनेते म्हणून निवड केली. त्यावेळी त्यांच्या नेतृत्वात धनंजय मुंडे भाजपवर जोरदार टीका करत होते. ज्या अधिवेशनात धनंजय मुंडे भाजपविरोधात बोलत होते, त्याच अधिवेशनात भाजपच्या एका मोठ्या नेत्याने करुणा मुंडे यांना आमंत्रित करून एक पत्रकार परिषद घेतली. त्या पत्रकार परिषदेत करुणा मुंडे बोलल्या आणि त्याच्या दुसऱ्या दिवसापासून धनंजय मुंडे यांनी भाजपवर टीका करणे सोडून दिले. पण तरीही लोक हुशार आहेत. ज्यांनी लोकांनी बाहेरून येऊन या ठिकाणी उमेदवारी दाखल केली, त्यांना एकही मतदान पडणार नाही. तसेच जे बारामतीमधील उमेदवार आहेत, त्यांना स्वतःचे मतदान सोडले, तर त्यांच्या कुटुंबातीलही मतदान पडणार नाही, असे रोहित पवार अप्रत्यक्षपणे करुणा मुंडे यांना भाजपची फुस असल्याचा आरोप करताना म्हणाले.





### माळेगाव कारखान्याकडून शेतकऱ्यांना ऊसासाठी पैसे

बारामती तालुक्यातील माळेगाव सहकारी साखर कारखान्याने २०२५-२६ च्या गाळप हंगामासाठी एफआरपीपेक्षा जास्त पैसे देऊन शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे. कारखान्याच्या अध्यक्षा आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी जाहीर केले की, कारखान्याने निर्धारित ३,२७० रुपयांच्या एफआरपीऐवजी प्रति टन ३,३०० रुपये ऊस दिला आहे. इतकेच नाही, तर ५ फेब्रुवारीनंतर गाळपासाठी आलेल्या बाहेरील भागातील उसासाठी (गेटकेन) कारखान्याने अतिरिक्त १०० रुपये दिले, ज्यामुळे प्रति टन ३,४०० रुपये दिले गेले. साखर कारखान्याने या हंगामात १.२ दशलक्ष टन उसाचे गाळप करण्याचे उद्दिष्ट ठेवले होते, परंतु प्रति एकर उत्पादनात घट झाल्यामुळे, ६ मार्चपर्यंत १२५ दिवसांत एकूण १०.८९ दशलक्ष टन उसाचे गाळप झाले. यामध्ये घटक देशांकडून मिळालेल्या ७.२० लाख टन उसाचा आणि उर्वरित ऊस गैर-घटक सदस्य व ऊस पुरवठादारांकडून मिळालेल्या ऊसाचा समावेश आहे. कार्यकारी संचालक अशोक पाटील यांच्या मते, कारखान्याने १२.२८३% सरासरी रिकव्हरीसह १२,७७,१०० क्विंटल साखरेचे विक्रमी उत्पादन साधले आहे. साखर उत्पादनाव्यतिरिक्त, कारखान्याने उप-उत्पादनांच्या क्षेत्रातही उत्कृष्ट कामगिरी केली. या कालावधीत ८.८९ कोटी युनिट विजेचे उत्पादन झाले, त्यापैकी ५.२१ कोटी युनिट वीज महावितरणला निर्यात करण्यात आली. याव्यतिरिक्त, डिस्टिलरी विभागामार्फत ७६.२३ लाख लिटर इथेनॉल आणि ९३.८१ लाख लिटर स्पिरिटचे उत्पादन झाले.



## नाशकातील बैठकीत आयटी असोसिएशनचा निर्णय

# आयटी कंपन्यांत स्वैराचार खपवून घेणार नाही

▶ नाशिक, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. बहुराष्ट्रीय आयटी कंपनीत धर्मांतर आणि महिलांच्या शोषणाचा धक्कादायक प्रकार समोर आल्यानंतर नाशिक आयटी असोसिएशनची (निटा) सातपूर येथे विशेष बैठक झाली. त्यात कॉर्पोरेट कल्चरच्या नावे सुरू असलेला स्वैराचार खपवून घेतला जाणार नसून, भारतीय संस्कृतीचे पालन करणे प्रत्येकासाठी बंधनकारक असेल, असा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. भारतीय संस्कृती, शिष्टाचार आणि व्यावसायिक मूल्यांवर आधारित सक्षम व सुदृढ कार्यसंस्कृती उभारणे गरजेचे आहे. समोर आलेला प्रकार धक्कादायक असून, कॉर्पोरेट कल्चरच्या नावाखाली सुरू असलेला स्वैराचार गंभीर आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांच्या विशेषतः महिला सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत असल्यामुळे आयटी क्षेत्रात भारतीय संस्कृती रुजविणे काळाची गरज असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. कर्मचाऱ्यांसाठी हेल्पलाइन ई-मेल काढण्यात येणार असून, या माध्यमातून त्यांना थेट पोलिसांकडे तक्रार करता येणार आहे. पॉश आणि विशाखा नियमांबाबत काटेकोर पालन करण्याबाबतच्या सूचना बैठकीत देण्यात आल्या आहेत. बैठकीत निटा अध्यक्ष अमर ठाकरे, उद्योजक प्रदीप पेशकार, अरविंद महापात्रा, माजी अध्यक्ष मकरंद सावरकर यांची उपस्थिती होती. ऑफलाईन आणि ऑनलाईन पद्धतीने झालेल्या या बैठकीस १२५ उद्योजक उपस्थित होते.



**बैठकीतील निर्णय**

- पॉश नियमांची काटेकोर अंमलबजावणी. विशाखा समितीचे सक्रिय, उत्तरदायी आणि प्रभावी कार्य अनिवार्य.
- कार्यस्थळी सुरक्षित व सन्मानजनक वातावरण. गुड टच बॅड टचसह वैयक्तिक मर्यादा आणि सीमारेषा आखणे.
- मौखिक व शारीरिक संकेत तसेच संभाव्य धोक्याचे संकेत ओळखण्याचे प्रशिक्षण. नवीन व महिलांसाठी सुरक्षित, विश्वासार्ह वातावरण.
- संतुलित कार्यसंस्कृती, पुरुष कर्मचाऱ्यांनी व्यावसायिक मर्यादा पाळणे, सहकाऱ्यांशी आदर व सन्मानाने वागणे, शिष्टाचार राखणे.
- प्रत्येकाला कामाच्या स्वरूपानुसार जबाबदाऱ्या देणे. अनावश्यक काम, दबाव किंवा शोषण ओळखण्यासाठी जागरूकता.
- प्रत्येक आयटी कार्यालयात पोलीस, समाजसेवक, ज्येष्ठ पत्रकारांचे संपर्क क्रमांक दर्शनी भागात लावणे बंधनकारक.

# समृद्धीवर ट्रॅव्हल्सची धडक,२ गंभीर

▶ जालना , नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. समृद्धी महामार्गावर अपघातांची मालिका सुरूच असून बुधवारी सकाळी ९.३० वाजता सुमारास बदनापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ओव्हरटेक करण्याच्या नादात एका खासगी ट्रॅव्हल्सने समोर जाणाऱ्या आयशर टेम्पोला पाठीमागून जोराची धडक दिली. या अपघातात दोन प्रवासी गंभीर जखमी झाले असून चार जण किरकोळ जखमी झाले आहेत. सुदैवाने, बसमधील इतर ४३ प्रवासी सुरक्षित असून मोठी जीवितहानी टळली आहे. नागपूर कॉरिडॉरवरील चॅनल क्रमांक ३७७.४ जवळ हर्ष ट्रॅव्हल्स ही बस समोरून जाणाऱ्या आयशर टेम्पोला ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न करत होती. याच प्रयत्नात चालकाचे बसवरील नियंत्रण सुटले आणि बस आयशरवर वेगाने आदळली. या धडकेत ट्रॅव्हल्सच्या समोरील भागाचे मोठे नुकसान झाले आहे. या अपघातात चालक अंकित कुशवा (३१) आणि शौर्य पवन सिंग (९) हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत. तसेच मेघा लक्ष्मण पांडे, खुशी चंद्रमोहन पांडे, नीलम पवन सिंग आणि पूर्वी पवन सिंग हे प्रवासी किरकोळ जखमी झाले आहेत.

# विहीरच चोरीला गेली, शेतकऱ्याचा गळफास

## हिंगोलीत ३ अधिकाऱ्यांवर गुन्हा

**हिंगोली.** भ्रष्ट शासकीय यंत्रणा आणि पोलिसी जाचापायी तरुण शेतकऱ्याने शेतातील झाडाला गळफास घेत आयुष्य संपवल्याची घटना सेनगाव तालुक्यातील धनगरवाडी गावात घडली आहे. गोरख पातळे (२६) असे या मृत शेतकऱ्याचे नाव आहे. याप्रकरणी ३ अधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. सेनगाव पंचायत समितीने रोजगार हमी योजनेतून शेतकऱ्यांच्या शेतात कागदोपत्रीच विहिरी खोदल्या होत्या. अधिकाऱ्यांनी यात मोठा आर्थिक भ्रष्टाचार केला होता. विहीर चोरीच्या या घोटाळ्यानंतर ३ अधिकारी, कर्मचाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला, तर जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांना निलंबित केले होते. घोटाळ्याच्या तपासादरम्यान पोलिसांनी शेतकरी गोरखला चौकशीसाठी बोलावले होते. पोलिसांनी त्याला मारहाण, दमदाटी करत कारवाईची धमकी दिल्याचे बोलले जाते. या धसक्यानेच गोरखने आत्महत्या केल्याचा आरोप होत आहे. दोषी पोलिस, प्रशासकीय अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई होत नाही तोवर गळफास घेतलेल्या अवस्थेतील मृतदेह खाली उतरू देणार नाही, असा पवित्रा गावकऱ्यांनी घेतला.

# सुप्रिया सुळेंच्या जावयाचा रायगडमध्ये ऊर्जा प्रकल्प

## सरकारचा करार, ५.५० हजार कोटींची गुंतवणूक

▶ मुंबई , नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या खा. सुप्रिया सुळे यांचे होणारे जावई सारंग लखानी यांच्या कंपनीने राज्य सरकारसोबत मोठा सामंजस्य करार केला आहे. या कराराची एकूण किंमत ५ हजार ७६० कोटी रुपये असून, हा प्रकल्प राज्यातील वीज निर्मिती क्षमतेत मोठी भर घालणार असल्याचे सांगितले जात आहे. हा करार नोव्हॅरियन एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीसोबत करण्यात आला आहे. जलसंपदा विभागाच्या माध्यमातून हा प्रकल्प उभारण्यात येणार असून, रायगड जिल्ह्यातील महाड तालुक्यातील रानवाडी येथे त्याची अंमलबजावणी होणार आहे. या प्रकल्पाद्वारे १२०० मेगावॅट वीज निर्मिती करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकल्पाबाबत प्रतिक्रिया देताना सांगितले की, महाराष्ट्र उदंचन जलविद्युत प्रकल्पांच्या माध्यमातून देशात सर्वाधिक ऊर्जा निर्मिती क्षमता असलेले राज्य बनू शकते. या क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर प्रकल्प सुरू असून, त्यातून सुमारे एक लाख मेगावॅट वीज निर्मितीची क्षमता उभारण्याचे उद्दिष्ट आहे. या नव्या करारामुळे त्या दिशेने आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला जाईल, असे त्यांनी नमूद केले.



## उलटतपासणी : सात्यकी सावरकर यांची भूमिका

# ते ५६८ क्रांतीवीर आदरणीयच

▶ पुणे, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. अंदमान कारागृहात स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबरोबर काळ्या पाण्याची शिक्षा भोगणाऱ्या ५६८ क्रांतिकारींनी हालअपेष्टा सहन केल्या. यामध्ये, काहींचा मृत्यू झाला. ते सर्व माझ्यासाठी समान असून, मला त्यांच्याविषयी आदर आहे, अशी माहिती स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नातू सात्यकी सावरकर यांनी न्यायालयात दिली. काळ्या पाण्याच्या शिक्षेदरम्यान काही क्रांतिकारकांचा अंदमानच्या कारागृहातच मृत्यू झाल्यामुळे त्यांना देखील स्वातंत्र्यवीर म्हणता येईल का? या बचाव पक्षाने विचारलेल्या प्रश्नावर त्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. लंडन येथील अनिवासी भारतीयांसमोर राहुल गांधी यांनी केलेल्या भाषणात स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी बदनामीकारक विधान केले होते. त्यामुळे स्वातंत्र्यवीर सावरकरांचे नातू सात्यकी सावरकर यांनी गांधी यांच्याविरोधात मानहानीचा दावा दाखल केला आहे. पुणे जिल्हा व सत्र न्यायालयातील एमपीएमएलए या विशेष न्यायालयात या खटल्याची सुनावणी सुरू आहे. सध्या फिर्यादी सात्यकी सावरकर यांची उलटतपासणी सुरू आहे. पुढील सुनावणी दि २९ एप्रिल रोजी होणार आहे.बचावपक्षातर्फे ॲड. मिलिंद पवार हे उलटतपासणी घेत असून, यादरम्यान त्यांनी विविध तांत्रिक मुद्द्यांवर प्रश्न उपस्थित केले. उलटतपासणी करताना ॲड. पवार यांनी, स्वातंत्र्यसंग्रामात योगदान देणाऱ्या सर्व क्रांतिकारकांना 'स्वातंत्र्यवीर' म्हणणे योग्य ठरेल का? असा प्रश्न उपस्थित केला. त्यावर सावरकर यांनी, सशस्त्र व निशस्त्र अशा दोन्ही प्रकारचे क्रांतिकारक होते, असे सांगत, 'महात्मा' ही उपाधी मोहनदास करमचंद गांधी यांना जनतेने दिली.



# भाजप ७ हजार मतदार रेल्वेने बंगालला नेणार

**मुंबई .** भाजपकडून पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांच्या सत्तेला आव्हान देण्यासाठी मिशन बंगाल राबवले जात आहे. त्यात आता महाराष्ट्र भाजपही सक्रिय झाले आहे. या मोहिमेचा भाग म्हणून मुंबईहून पश्चिम बंगालकडे विशेष रेल्वे सोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून १७ एप्रिल रोजी ही विशेष रेल्वे सुटणार असल्याची माहिती समोर आली आहे. महाराष्ट्रातील मुंबई, पुणे आणि इतर शहरांमध्ये मोठ्या संख्येने पश्चिम बंगालमधील कामगार वास्तव्यास आहेत.
यापैकी अनेक जण असंघटित क्षेत्रात काम करतात. त्यामुळे त्यांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी आपल्या राज्यात जाता यावे, यासाठी ही विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. या रेल्वेमार्फत सुमारे ७ हजार मतदारांना पश्चिम बंगालमध्ये पोहोचवण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

# बाजार समित्यांत ५० किलोची गोणी

**मुंबई.** राज्यात सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्यांत कांदा, बटाटा आदी शेतमालाच्या गोणीची वजनमर्यादा ५० किलोपर्यंतच ठेवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. गोण्यांची चढ-उतार करणाऱ्या माथाडी कामगारांना त्रास होऊन त्यांच्या प्रकृतीला बाधा होऊ नये म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभागाने तसे परिपत्रक काढले आहे. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेने याआधीच घेतलेल्या या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे केंद्र सरकारने राज्याला कळविले होते.

## Short News

### संगमनेर तलाठी कार्यालयात गैरप्रकार

संगमनेर. येथे तलाठी अनुपस्थित असताना खासगी व्यक्ती शासकीय कागदपत्रे हाताळत असल्याचा गंभीर प्रकार उघड झाला. आमदार अमोल खताळ यांच्या अचानक पाहणीत मन्सूर शेख व त्यांचा जावई काम करताना आढळले. नागरिकांकडून अडवणूक व पैशांची मागणी होत असल्याच्या तक्रारीनंतर कारवाईचे आदेश देण्यात आले.

### १५ मंडळाच्या आयोजकांवर गुन्हा

**हिंगोली.** वसमत येथे मिरवणुकीच्या वेळी ध्वनी मर्यादेचे उल्लंघन केल्याच्या आरोपावरून १५ जयंती मंडळाच्या आयोजकांवर वसमत शहर पोलिस ठाण्यात बुधवारी पहाटे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वसमत शहरातील विविध प्रभागातील १५ जयंती मंडळाच्या आयोजकांनी मिरवणुकीसाठी पोलिस विभागाकडे परवानगी मागितली होती. यावेळी वसमत शहर पोलिसांनी काही अटींसह मिरवणुकीसाठी परवानगी दिली होती. यामध्ये प्रामुख्याने ध्वनी मर्यादेचे उल्लंघन करू नये असे स्पष्ट नमुद करण्यात आले होते. दरम्यान, त्यानंतरही १५ जयंती मंडळांनी वसमत शहरात मिरवणुका काढल्या होत्या. या मिरवणुकांसाठी डीजे लावण्यात आला होता. त्यामध्ये शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, सत्यनारायण टॉकीज, अशोक नगर, झेंडा चौक, मामा चौक या भागात डीजेचा आवाज वाढवून ध्वनी मर्यादेचे उल्लंघन करण्यात आले.

### आंब्याचे आमिष चिमुरडीवर अत्याचार

**पुणे.** अडीच वर्षांच्या चिमुरडीला आंबा खाण्याचे आमिष दाखवून तिच्यावर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची घटना पिंपरी-चिंचवड शहरातील एकतानगरात घडली. या प्रकरणी ४७ वर्षीय विजय भोसले या संशयित आरोपीला काळेवाडी पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. आरोपीने छोट्या मुलीला आंबा देण्याच्या बहाण्याने आपल्या खोलीत बोलावले आणि तेथे तिच्यावर निर्घृणपणे अत्याचार केला. मंगळवारी सकाळी मुलीला असह्य त्रास सुरू झाल्याने तिच्या पालकांनी तिला तातडीने पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या रुग्णालयात दाखल केले. डॉक्टरांनी केलेल्या तपासणीत हा प्रकार समोर आला.

### विधेयकामुळे उत्तर-दक्षिण देशाच्या विभाजनाचा धोका

**मुंबई.** जनगणनेचा अहवाल २०२७ मध्ये पूर्ण होणार आहे. घटनेतील संबंधीत कलमाप्रमाणे अनुसूचित जाती-जमाती व इ. समाजांना यथायोग्य प्रतिनिधित्व देण्याची तरतुद यामध्ये असताना वर्षभरात उपलब्ध होणाऱ्या अहवाला ऐवजी ११ वर्षांपूर्वीच्या अहवालावर आधारित विधेयक, २९ एप्रिल पूर्वीच उरकण्याचा घाट मोदी सरकार कशाकरिता घालत आहे, असा सवाल काँग्रेसचे वरिष्ठ प्रवक्ते व माजी आमदार गाडगीळ यांनी उपस्थित केला आहे.

# मंदिरात पेड दर्शन, राजकीय नियुक्त्या बंद करा

## मंदिर महासंघाची मागणी

▶ **नाशिक.** दर्शनाच्या पासचा काळाबाजार करण्याची वृत्ती सर्वत्र फोफावत असून, नाशिक, तुळजापूरसह राज्यातील सर्वच सरकारीकरण झालेल्या मंदिरांमधील 'सशुल्क दर्शनसेवा' (पेड दर्शन) सुविधा बंद करावी, अशी मागणी मंदिर महासंघाने केली आहे. महासंघाचे राष्ट्रीय संघटक सुनील घायवट यांनी म्हटले आहे की, खरेतर 'सशुल्क दर्शनसेवा' हा प्रकारच चुकीचा आहे. यातून भाविकांत भेदभावाची भावना निर्माण होते. दूरवरून येणाऱ्या ज्या भक्ताकडे पैसे नसतील तर त्याने काय करायचे? पैशांअभावी दर्शन नाकारले जाणे हा त्यांच्या श्रद्धेचा अपमान आहे आणि संविधानाने दिलेल्या मूलभूत घटनात्मक धार्मिक अधिकारावर आणलेली गदा आहे. देवाच्या नजरेत गरीब-श्रीमंत समान असल्याने प्रत्येकासाठी दर्शनाची पद्धत सारखीच असणे अपेक्षित आहे. उत्पन्न वाढीचा विचार करण्यासाठी मंदिर हे एखादे व्यावसायिक आस्थापन वा दुकान आहे का, असा सवाल घायवट यांनी केला आहे. दरम्यान, भाविकांची आर्थिक लूट केल्याप्रकरणी राकाँ शरद पवार गटाचे प्रदेश युवक कार्याध्यक्ष तथा त्र्यंबकेश्वर संस्थानचे विश्वस्त पुरुषोत्तम कडलगसह गोटीराम मनाजी पेहरे व अभिषेक कडलग यांना पोलिसांनी अटक केली आहे.



### तुळजापुरातही होतो पासचा काळाबाजार

दोनशे रुपयांचा पास असताना १० मिनिटांत दर्शनाचे आमिष दाखवून ३ ते १२ हजार रुपये घेतल्याचा प्रकार त्र्यंबकेश्वरमध्ये समोर आला. तुळजापूरच्या तुळजाभवानी मंदिरात हाच प्रकार होत असून, २०० रुपयांत पास देऊन विशेष दर्शन दिले जाते. नवरात्र काळात या पासचे ३०० रु, ५०० आणि १ हजार रुपये घेतले जातात. जादा शुल्क घेऊन सोडल्याच्या तक्रारी भक्तांनीच केल्या आहेत.

### ट्रस्टच्या घटनांमध्ये तशी तरतूद करावी

मंदिरे सरकार किंवा राजकीय नियुक्त्या असलेल्या समित्यांच्या कह्यात जातात, तेव्हा भक्तीऐवजी व्यापारी वृत्तीचा शिरकाव होतो. त्र्यंबकेश्वरची घटना मंदिर सरकारीकरणाचे दुष्परिणामच आहे. त्र्यंबकेश्वरच्या विश्वस्त नियुक्तीत मोठा आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप माजी विश्वस्तांनी केला आहे. असे प्रकार टाळण्यासाठी देवस्थानांमध्ये विश्वस्त म्हणून राजकीय पक्षाचा पदाधिकारी नेमण्याऐवजी देवाचा भक्त-भाविक म्हणून नियुक्ती व्हावी. देवस्थानच्या घटनेत तसा बदल करावा, अशी मागणी महासंघाने केली आहे.

# सालेमच्या तातडीने सुटकेला नकार

**मुंबई.** अबू सालेम याला मोठा दिलासा मिळाला नाही. मुंबई उच्च न्यायालय यांनी त्याची तात्काळ सुटकेची याचिका बुधवारी फेटाळून लावली. सालेमने आपल्या याचिकेत दावा केला होता की, पोर्तुगालमधून प्रत्यर्पणाच्या अटींनुसार त्याने भारतात २५ वर्षांची शिक्षा पूर्ण केली आहे. चांगल्या वर्तनामुळे मिळणारी सूट धरल्यास त्याची शिक्षा पूर्ण झाल्याने त्याला मुक्त करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली होती.

**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**
नगर अभियंता बांधकाम विभाग

**जाहीर टेंडर नोटिस**

या विभागाकडुन महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोतथान सन 2025-26 योजने अंतर्गत प्रशासकीय मान्यता क्र. 124 दि. 18/03/2026 एकूण 5 बाधकाम कामे) (सभा मंडप बांधणे) विकास कामाचे निविदा प्रसिध्द करण्यात आले आहे.

1) 2026_SMC_1279926_1

सदर कामाचा तपशील www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर दि. 16/04/2026 ते दि. 24/04/2026 पर्यंत पाहण्यास उपलब्ध आहे.

सही/-
(सारिका आकुलवार)
प्र. नगर अभियंता
सोलापूर महानगरपालिका

# 'हनीट्रॅप' हेरगिरीत शास्त्रज्ञ कुरुलकरला जामीन नाही


## हायकोर्टाने अर्ज फेटाळला

**मुंबई.** पाकिस्तानी गुप्तहेर तरुणीच्या हनीट्रॅपमध्ये तिला गोपनीय माहिती पुरवल्याच्या कथित प्रकरणात संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेचे (डीआरडीओ) निवृत्त शास्त्रज्ञ प्रदीप कुरुलकर यांचा जामीन अर्ज मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळला. कुरुलकर यांनी तरुणीशी संभाषणात अत्यंत महत्त्वाची माहिती उघड केली होती. न्यायमूर्ती एस.जी. दिगे यांच्या खंडपीठाने निरीक्षण नोंदवले की, निवृत्त असूनही कुरुलकर हे आपल्या हाताखाली आधी काम केलेल्या काही साक्षीदारांवर प्रभाव पाडू शकतात. तसेच ते पळून जाण्याची शक्यताही न्यायालयाने वर्तविली.
कथित 'हनीट्रॅप' हेरगिरी प्रकरणी डीआरडीओने दाखल केलेल्या तक्रारीच्या आधारे एटीएसने ३ मे २०२३ रोजी कुरुलकर (६०) यांना अटक केली होती. पाकिस्तानी गुप्तहेराशी कथितरीत्या माहिती शेअर केल्याचा आरोप असलेली माहिती आधीच सार्वजनिक डोमेनमध्ये सर्वांसाठी उपलब्ध होती.
याउलट, जामिनाला विरोध करताना, सरकारी पक्षाने युक्तिवाद केला की, या संभाषणात संरक्षण क्षेत्राशी संबंधित संवेदनशील माहितीचा समावेश होता. अर्ज फेटाळताना खंडपीठाने नमूद केले की, डीआरडीओसारख्या संस्थेत वरिष्ठ पदावर असूनही कुरुलकर यांनी एका पाकिस्तानी तरुणीसोबत वर्षभरापेक्षा अधिक काळ जवळीकीची संभाषणे केली. आणि या काळात त्यांनी महत्त्वपूर्ण माहिती शेअर केली.



# २३ दिवसांत राज्यात ५१ आयएएस बदल्या

## आधी ४६, आता पुन्हा ५ अधिकाऱ्यांचे आदेश



**मुंबई.** राज्यात मागील २३ दिवसांत प्रशासनातील सनदी अधिकाऱ्यांच्या तिसऱ्यांदा बदल्या झाल्या आहेत. याआधी ४६ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून, आता ५ बड्या अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश निघाले आहेत. गेल्या काही दिवसात राज्यात विविध विभागात बदल्यांचे सत्र सुरू आहे. आणखी काही बदल्या होतील.

| अधिकारी | आधीचे पद | नवी पदस्थापना |
|---|---|---|
| १. बी. एन. पाटील | संचालक, पर्यटन, | मुंबई प्रकल्प संचालक, रुसा, मुंबई |
| २. मंगेश जोशी | उपमहासंचालक, यशदा, पुणे | संचालक, पर्यटन, मुंबई |
| ३. कुलदीप जंगम | सीईओ, जि.प., सोलापूर | अति. आयुक्त, पिं-चिं मनपा |
| ४. कुशल जैन | आयटीडीपी, अहेरी | सीईओ, जि.प., सोलापूर |
| ५. रेवैया डोंगरे | सहा. कलेक्टर, धाराशिव | आयटीडीपी, पांढरकवडा |

**Office of the Managing Director, Maharashtra Bamboo Development Board,**
New Katol Naka Square. Gorewada Road, Nagpur-440013
Phone No. 0712-2970562
Email- mahabamboo @mahaforest.gov.in

**E-TENDER FOR PROCUREMENT OF TISSUE CULTURE BAMBOO PLANTS REQUIRED UNDER NATIONAL BAMBOO MISSION AND ATAL BAMBOO SAMRUDDHI YOJNA**

**Tender No. 01/2026-27**

Maharashtra Bamboo Development Board, Nagpur, Maharashtra is in need of secondary hardened Tissue Cultured Bamboo plants of various bamboo species for National Bamboo Mission and Atal Bamboo Sanruddhi Yojna, in the month of June and July 2026. The agency has to deliver planting materials at various destinations as ordered by the Managing Director, Maharashtra Bamboo Development Board. Interested Tissue Culture plant producers fulfilling given conditions may quote specieswise, circlewise, rates of Tissue Cultured Bamboo Plants through e-tender on web site http://www.mahatenders.gov.in from date **16th April, 2026 to 08th May, 2026.** The terms and conditions can be viewed on website mahaforest.gov.in.

**Important dates to be remembered.**

| | |
|---|---|
| Opening of bid | 16th April, 2026 |
| Closing of bid | 08th May, 2026, at 5.00 P.M. |
| Pre-bid meeting | 27th April, 2026 |
| Opening of technical bid | 11th May, 2026 |

DGIPR/2026-27/C232

**Managing Director,**
**Maharashtra Bamboo Development Board**

**कार्यालय नगर परिषद नरखेड,**
**बांधकाम विभाग जिल्हा नागपुर 441304**
ई-मेल : menarkhed@gmail.com दुरध्वनी क्र. : 07105-232041

जा. क्र. नपन/निविदा सूचना क्र. /2026 दिनांक:- / /2026

**ई-निविदा सूचना क्रं. 2025-2026 (पाचवी वेळ)**

नगर परिषद नरखेडला महाराष्ट्र शासनाचे खात्यात पंजीबध्द असलेल्या योग्य त्या वर्गात नोंदणीकृत अनुभवी कंत्राटदारांकडून नगर परिषद नरखेड क्षेत्रात केंद्र शासनाच्या भांडवली गुंतवनुकीसाठी विशेष सहायय योजना निधी अंतर्गत एक कामाचे बांधकाम कार्य करण्याकरीता ई- निविदा बी-1 व्दिलिफाफा पध्दतीने कामाचे ई-निविदा मागविण्यात येत आहे. निविदेचा विस्तृत नमुना महाराष्ट्र www.mahatenders.gov.inin या वेबसाईडवर दिनांक 16/04/2026 पासुन पाहण्यास उपलब्ध आहे.

स्वा/-
मुख्याधिकारी
नगर परिषद नरखेड

बैंक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

**शाखा - गांधीबाग नागपूर**
हल्दीराम बिल्डींग, 1174, जलालपूरा, गांधिबाग, नागपूर - 440002.

**स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना** "परिशिष्ट-IV-A [नियम 6 (2) आणि 8 (6) ची तरतूद पहा]

**सिक्यूरिटी इंटरेस्ट (ईन्फोर्समेंट) रुल्स 2002 च्या नियम 6 (2) आणि 8 (6) च्या तरतुदीसह सिक्युरिटायझेशन अ‍ॅन्ड रिकंस्ट्रक्शन ऑफ फाइनैंशियल अ‍ॅसेटस अ‍ॅन्ड ईन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ऍक्ट 2002 च्या अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना .**

याद्वारे सामान्यत: जनतेला आणि विशेषत: कर्जदार, गहाणदार आणि जामीनदारांना नोटीस दिली जाते की खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता सुरक्षित कर्जदाराकडे गहाण/आकारणी केली आहे, ज्याचा ताबा कर्जदाराने घेतला आहे. बँक ऑफ बडोदाचे अधिकृत अधिकारी, सुरक्षित कर्जदार, खाली नमूद केलेल्या खात्यांतील थकबाकी वसूल करण्यासाठी **"जसे आहे तेथे", "जसे आहे तसे", आणि "जे काही आहे"** या आधारावर विकले जातील. कर्जदार/S/गहाणदार/जमीनदार/S/सुरक्षित मालमत्ता/S/देय/राखीव किंमत/ई-लिलावाची तारीख आणि वेळ, ईएमडी आणि बोली वाढीची रक्कम यांचे तपशील खाली नमूद केले आहेत.

| अनु./ लॉट क्र. | कर्जदार/जमानतदार/ गहाणदार यांचे नाव आणि पत्ता | स्थावर मालमत्तेचे वर्णन (गहाणदार) | एकूण देय. | 1. राखीव किंमत<br>2. अर्नेस्ट मनी डिपॉझिट (ईएमडी)<br>3. बिड वाढीव रक्कम | ई-लिलावाची तारीख ई लिलावाची वेळ - प्रारंभ वेळ ते समाप्ती वेळ | ताब्यात घेण्याची स्थिती (सांकेतिक/ वास्तविक) | मालमत्ता तपासणी तारीख आणि वेळ. | संपर्क व्यक्तीचे नाव व संपर्क क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1. श्रीमती प्रणाली सत्रुघन बागडे (कर्जदार) आणि<br>2. श्री सौरभ दिनेश उपाध्याय (जमानतदार) | इक्वीटेबल गहाण असलेले सर्व भाग आणि तुकडा असलेले आरसीसी सुपरस्ट्रक्चर समावेश निवासी फ्लॅट नं. एफ-102, पहिला मजला "आदित्य कॉम्प्लेक्स" बांधकामासह असलेले जमिनीवर असलेले घर नं. एफ/81, 82, क्षेत्रफळ एरीया 93.5 चौ.मी. असलेले सिटी सर्व्हे नं. एफ - 81 आणि 82, शिट नं. 6, ब्लॉक नं. 54, झोन नं. 29/1, प्रभाग नं. 2 असलेले मौजा कामठी, अविभाजीत 17.74% जमिनीचा हिस्सा असलेले आणि **संपत्तीची चर्तुसिमा खालीलप्रमाणे :** **पूर्व** - श्री. शेषमन ओसवाल यांचे घर, **पश्चिम** - रोड, **उत्तर** - नाला आणि लेन, **दक्षिण** - रोड आणि शास्त्री मंच. **(गहाणदार : श्रीमती प्रणाली सत्रुघन बागडे)** | रु. 9,04,245.45 + लागु न झालेले व्याज आणि अन्य खर्च | रु. 6,70,000/-<br>रु. 67,000/-<br>रु. 15,000/- | 04/05/2026 रोजी 14:00:00 ते 17:00:00 वा. पर्यंत | वास्तविक | 29/04/2026 रोजी 14:00:00 ते 17:00:00 वा. पर्यंत | श्री. विनोद गोखरे 9373561879 |

विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी, कृपया https://www.bankofbaroda.in/e-auction.htm आणि ऑनलाईन ऑक्शन पोर्टल https://baanknet.com या वेबसाइट लिंकला पहा/भेट द्या. तसेच, संभाव्य बोलीदार अधिकृत अधिकाऱ्याशी दूरध्वनी क्रमांक / मोबाईल क्रमांक 9373561879 वर संपर्क साधू शकतात.

येथे स्कॅन करा
तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी.

**दिनांक : 16/04/2026**
**स्थळ : नागपूर**
(इंग्रजीतील मूळ मजकूर ग्राह्य धरण्यात येईल)

**अधिकृत अधिकारी**
**बँक ऑफ बडोदा**

CMYK